लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : गुरूवार – १४ सप्टेंबर २०२३
वर्ष – ३७ वे
अंक – १६२
पाने – ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

लातूर - नाशिक
दररोज
रात्री ८.३० वाजता
Google Play
VISHWA TRAVELS APP
विश्व ट्रॅव्हल्स
२, उद्योग भवन कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, लातूर.
संपर्क : (02382) 242790, 254002, 249329,
88888 45403, 88888 45404.
Online Booking : www.vishwatravels.in

# मराठ्यांना टिकणारं आरक्षण देण्याची सरकारची भूमिका

## मुख्यमंत्र्यांकडून हमी : जरांगे यांचे उपोषण मागे



आंतरवाली : जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी गावात मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांचं गेल्या १६ दिवसांपासून उपोषण सुरू होतं. आज त्यांच्या आंदोलनाचा १७ वा दिवस होता. सरकारने मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन मागे घ्यावं म्हणून दोनदा जीआरही काढला होता. तरीदेखील आरक्षणाचा प्रश्न सुटला नव्हता. आता अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आंदोलनस्थळी जात जरांगे पाटलांची भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनी मनोज जरांगे यांची भेट घेऊन चर्चा केली आणि त्यानंतर जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतलं आहे. तसंच, यावेळी मुख्यमंत्र्यांनी आश्वासनही दिलं आहे. ते म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी हे सरकार कटिबद्ध आहे. मराठा समाजाला आरक्षण दिल्याशिवाय आम्हीसुद्धा स्वस्थ बसणार नाहीत.

मुख्यमंत्री म्हणाले की, मी बाबाला मघाशी सांगितलं की तुमचं पोरंग भारी आहे. स्वत:साठी नाही समाजासाठी लढत आहे. मनोजला मी गेल्या अनेक वर्षांपासून ओळखत आहे. त्यानं वैयक्तिक फायद्यासाठी कोणताही प्रश्न मांडला नाही. जेव्हा भेटला तेव्हा मराठा आरक्षणाबद्दलच आग्रही भूमिका मांडली. मी मनोजला मनापासून शुभेच्छा देतो. त्याचं मनापासून अभिनंदनही करतो.

एकनाथ शिंदे म्हणाले की, एखादं आंदोलन करणं आणि आमरण उपोषण करणं आणि ते जिद्दीनं पुढे नेणं, त्याला या महाराष्ट्रात जनतेचा प्रतिसाद मिळणं या सर्व गोष्टी कमीवेळा पाहायला मिळतात. पण त्याचा हेतू शुद्ध आणि प्रामाणिक असला की सगळी जनता तुमच्या मागे उभी राहते, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

ओबीसांना जे फायदे मिळत आहेत. ते समाजाला देत आहोत. काही त्रुटी आहेत, त्या दूर करत आहोत. जे आरक्षम दिलं गेलं ते आरक्षण मिळवून देण्याची आमची इच्छा आहे. त्यासाठी प्रयत्न करत आहोत, असं त्यांनी सांगितलं.

ज्यांच्याकडे कुणबी प्रमाणपत्र असतील, काहींकडे नसतील त्यांना न्याय देण्यासाठी जस्टीस शिंदे यांची समिती स्थापन केली आहे. त्यांचं काम सुरू झालं आहे. एक बैठक झाली आहे. दुसरी सुरू आहे. मराठा समाज कसा आहे, त्याचं राहणीमान कसं आहे ते तपासलं जात आहे. तुमचा माणूस सोबत दिला तर फायदाच होईल. तुम्ही वेळ दिला आहे ती चांगली गोष्ट आहे, असं म्हणत वेळेत काम करू असं शिंदे म्हणाले.

जरांगे पाटील म्हणाले की, समाजाच्या हिताचा निर्णय घेईल असे नेहमी सांगितले होते. प्रत्येक बैठकीत मुख्यमंत्री तुमचा विषय काढला. मराठा समाजाला तुमच्याकडून अपेक्षा आहेत. शिंदे हे मराठ्यांना न्याय मिळून देणार आहे. तर जीवाची राख रांगोळी झाली तरी मराठा समाजासोबत गद्दारी करणार नाही. तुमच्या राजकारणात आमच्या मुलाबाळांचे आयुष्य उद्ध्वस्त करू नका, माझा जीव गेला तर मी आरक्षणाचा लढा सुरू ठेवेन. चिठ्ठ्या फिट्ट्याचे कारण सांगू नका, आम्ही तसे करणार नाही. मी एक इंचही मागे हटलो नाही आणि हटणारही नाही. मुख्यमंत्र्यांना आणेल असे म्हटले होते ते आणले. आरक्षण मिळेपर्यंत मागे हटणार नाही त्यांच्या मागेच लागेन असं मनोज जरांगे पाटील म्हटलं आहे.

## चौंडी येथील उपोषणाची प्रशासनाकडून दखल; जिल्हाधिकारी यांची भेट

### -आ. प्रा राम शिंदे यांचा पुढाकार



चौंडी : भारतीय संविधानाने धनगर समाजाला दिलेल्या आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी यशवंत सेनेच्या वतीने जामखेड तालुक्यातील चोंडी येथे आमरण उपोषणाचे अंदोलन हाती घेण्यात आले आहे. सदर अंदोलनाकडे जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याची बाब समोर येताच आमदार प्रा राम शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाचे याकडे लक्ष वेधले होते. त्यानुसार अहमदनगरचे जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी बुधवारी सायंकाळी चोंडी येथे भेट दिली आणि अंदोलकांशी चर्चा केली. चोंडीतील अंदोलनाच्या मुद्द्यांचा अहवाल तातडीने सरकारला पाठविण्यात येईल, असे जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांनी स्पष्ट केले.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांपासून महाराष्ट्रातील धनगर समाज आरक्षणासाठी संघर्ष करत आहे. राज्य सरकारने केंद्र सरकारला शिफारस केल्यास संसदेच्या विशेष अधिवेशनात धनगर समाजाला न्याय मिळू शकतो. आता नाही तर पुन्हा कधी नाही या भावनेतून यशवंत सेना व राज्यातील धनगर समाज आरक्षणाच्या मागणीवरून आक्रमक झाला आहे. महाराष्ट्रातील धनगर समाज बांधवांचे शक्तीपीठ व ऊर्जाकेंद्र अशी ओळख असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगावी चोंडी येथे गेल्या सात दिवसांपासून आमरण उपोषणाचे अंदोलन हाती घेण्यात आले आहे. या अंदोलनाचा आजचा आठवा दिवस होता. या अंदोलनाला राज्यभरातून मोठा पाठिंबा मिळत आहे. विविध राजकीय पक्षांचे नेते तसेच राज्यभरातील शेकडो धनगर समाज बांधव अंदोलनस्थळी भेटी देऊन अंदोलनास पाठिंबा दर्शवत आहेत.

दरम्यान, बुधवारी सकाळी आमदार प्रा.राम शिंदे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेतली. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली होती. त्यानंतर त्यांनी अहमदनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क करत चोंडीतील परिस्थितीकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर जिल्हा प्रशासनात वेगाने हालचाली झाली. सायंकाळी ५ वाजता जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा व स्थानिक प्रशासनाच्या टीमसह चोंडीला भेट देऊन अंदोलकांशी संवाद साधला.

आमदार प्रा.राम शिंदे यांनी चोंडीतील उपोषणाच्या आंदोलनाचे गांभीर्य ओळखून तातडीने सरकार दरबारी पाठपुरावा हाती घेतला. त्यांनी जिल्हा प्रशासनाला चोंडीत भेट देण्यास भाग पाडले. गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणाच्या अंदोलनाचा चेंडू आता राज्य सरकारच्या कोर्टात जाणार असल्याने चोंडीचे अंदोलन सरकारला गांभीर्याने घ्यावे लागणार आहे. संसदेच्या विशेष अधिवेशनात धनगर आरक्षणाचा वटहुकूम काढून महाराष्ट्रातील धनगर समाजाला न्याय द्यावा या मागणीसाठी चोंडी येथे उपोषण सुरू आहे. या अंदोलनाची दखल घेऊन राज्य सरकार काय भूमिका घेणार याकडे महाराष्ट्रातील धनगर समाज बांधवांचे लक्ष लागले आहे.




जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्याकडून ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी मुर्गाप्पा खुमसे यांच्याशी बातचीत मराठवाडा मुक्तिसंग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र सेनानी मुर्गप्पा खुमसे, रेणापूर यांची जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी भेट घेतली. यावेळी मुर्गप्पा यांनी मुक्ति संग्रामतील थरारक घटना सांगितल्या. जिल्हाधिकारी यांनी त्या काळातील मुर्गप्पा यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल आम्हाला तुमचा अभिमान वाटतो म्हणून आम्ही सदैव तुमच्यासह सर्व थोर स्वातंत्र्यसेनानी यांच्याप्रती कृतज्ञतापूर्वक नमन करत असल्याची भावना व्यक्त केली. यावेळी जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या कुटुंबायांशीही हितगुज केले.

## सोयाबीनच्या गुणवत्तापूर्ण उत्पादनातून उत्पन्नवृद्धी आवश्यक : डॉ.बाबासाहेब ठोंबरे

लातूर : वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय, लातूर च्या वतीने ग्रामीण कृषि कार्यानुभव उपक्रम आणि कृषि औद्योगिक जागरूकता उपक्रमांतर्गत मौजे साई येथे सोयाबीन पिकावरील कीड व रोग व्यवस्थापन या विषयावर शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास अध्यक्षा म्हणून गावच्या सरपंच सौ.सुमित्राताई माने, उदघाटक महापूर गावच्या सरपंच सौ.कल्पनाताई माने, प्रमुख पाहुणे म्हणून कृषि महाविद्यालय, लातूरचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे व कार्यक्रम समन्वयक डॉ.विश्र्वनाथ कांबळे हे उपस्थित होते, तसेच श्रीपती पवार यांची उपस्थिती होती.

प्रमुख मार्गदर्शनपर भाषणात डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, शेतकऱ्यांनी हवामान बदलानुसार पीक पद्धतीचा अवलंब करून सोयाबीनचे गुणवत्तापूर्ण व कमी खर्चात उत्पन्न वाढवावे.पुढे त्यांनी असेही प्रतिपादन केले की, रासायनिक शेतीकडून सेंद्रिय शेतीकडे एकात्मिक पद्धतीचा अवलंब करून टप्या-टप्याने मार्गक्रमण करावे. यावेळी डॉ. विठोबा मुळेकर यांनी सोयाबीन पिकावरील एकात्मिक रोग व्यवस्थापना विषयी तर डॉ. दयानंद मोरे यांनी सोयाबीन वरील कीड व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले.




**लक्ष वेधून घेणारे छायाचित्र**

मनोज जरांगे पाटील यांनी जालना येथे मराठयांना आरक्षण मिळावे म्हणून आमरण उपोषणाला बसलेले आहेत. आज बैलपोळा असल्याने किनगाव, ता. अहमदपूर येथील एका शेतकऱ्यांने आपल्या बैलांच्या पोटावर मनोज जरांगे पाटील यांचा फोटो व सच्चा मराठा असे लिहलेले असल्याने सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

## दयानंद शिक्षण संस्था, लातूर

### सर्वसाधारण सभेच्या सभासदांना सूचना

दि. १४/०९/२०२३

दयानंद शिक्षण संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दि. २८/०९/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता खालील विषयावर विचार करून निर्णय घेण्यासाठी संस्थेच्या सभागृहात बोलावण्यात आली आहे. आपण उपस्थीत राहून सहकार्य करावे ही विनंती.

**विषय पत्रीका :**

१) दि. १५/०५/२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वृत्तांताचे वाचन करून कायम करणे.
२) संस्थेच्या वार्षिक अहवालाचे वाचन.
(वार्षिक अहवाल बैठकीत वाचन करण्यात येईल.)
३) संस्थेच्या सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ वर्षीच्या लेखापरिक्षण अहवालास मंजूरी देणे.
(लेखा परिक्षण अहवाल सोबत जोडला आहे.)
४) संस्थेच्या सन २०२३-२०२४ वर्षीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
(अंदाज पत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.)
५) संस्थेची सर्वसाधारण सभा एप्रील ते जून मध्ये आयोजीत करण्याऐवजी सप्टेंबर अखेरपर्यंत आयोजीत करण्यासाठी घटनेच्या कलम ०८ मध्ये दुरूस्ती करणे बाबत.
६) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

स्वाक्षरीत/-
(रमेश बियाणी)
**सरचिटणीस**

**नोट :-**

१) एखाद्या सभासदास हिशोबासंबंधी प्रश्न विचारावयाचे असल्यास बैठकीच्या पुर्वी ७२ तास अगोदर लेखी विचारणा करावी. ऐनवेळी प्रश्न विचारल्यास उत्तर देणे बंधनकारक राहणार नाही.
२) गणसंख्ये अभावी बैठक होऊ शकली नाही तर अर्धा तास वाट पाहून त्याच ठिकाणी ठरलेल्या विषयपत्रिकेवर विचार करून निर्णय घेण्यासाठी ही बैठक होईल व अशा बैठकीस कोरमची आवश्यकता राहणार नाही.
३) सर्व सभासदांना मिटींगचा अजेंडा वाटप करण्यात येत आहे. नजरचुकीने कोणी राहिल्यास हाच अजेंडा समजून बैठकीस उपस्थीत रहावे.

स्वाक्षरीत/-
रमेश बियाणी
**सरचिटणीस**

## त्यांच्या मते....

**▣ आरक्षण देण्याची दानत नसेल तर तसे सांगा, समाज आता डोळसपणे तुमच्याकडे पाहतोय.**
-खा. ओमराजे निंबाळकर

घटनात्मक तरतुदीकडे निश्चीतच डोळसपणे पाहावे लागणार

**▣ निवडणूक आयोग भाजपाच्या हातातील बाहुले.**
- आ. रोहित पवार

सत्ताधारी बाहुले म्हणूनच आयोगास हाताळते.

**▣ हजारो वर्ष जे दबले-दडपले गेले होते. त्यांना समान पातळीवर आणण्यासाठी आरक्षण आहे.**
- ना. छगन भुजबळ

आता, असा विचार कोण करतय ?

**▣ दोन्ही उपमुख्यमंत्री व मी आमच्यातील संवाद 'सोशल मीडिया' वरून चुकीच्या पद्धतीने फिरवला.**
- एकनाथ शिंदे

संवादच नव्हे, स्वगत रेकॉर्ड करण्याची यंत्रणा विकसीत झाली आहे असे म्हणतात.

## लैंगिक अत्याचार आरोपीस वीस वर्षाचा सश्रम कारावास

लातूर : लातूर येथे भाड्याने राहत असलेल्या घरातील अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी न्यायालयाने एका नोकरदारास दोषी ठरवले असून त्यास वीस वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. लातूर जिल्ह्यात लैंगिक अत्याचार प्रकरणी वीस वर्षाची शिक्षा ठोठावण्याचा हा पहिलाच प्रकार आहे.

पिडीतेचा लातूर येथील राहत्या घरी तिचा जवळचा नातेवाईक आरोपी सागर बाबासाहेब उर्फ धनंजय सूर्यवंशी व तिची पत्नी हे नोकरी निमित्त पीडिताच्या घरी राहण्यासाठी आले. त्यावेळी सन २०१९ मध्ये पीडीता इयत्ता नववी मध्ये शिक्षण घेत होती. पिडीताला शाळेत सोडण्यासाठी व शाळेतून घरी घेऊन येण्यासाठी सदर आरोपी स्कुटीवर जात असे तेव्हा तो पिडीताच्या अंगाला वाईट भावनेने स्पर्श करायचा. पिडीताने विरोध केला तेव्हा तुझ्या आई-वडिलांचा माझ्यावर जास्त विश्वास आहे, मी तुझ्याबद्दल काहीही सांगून तुझी शाळा बंद करतो. अशी धमकी देत असे तसेच तिची आई, मावशी नोकरीला व भाऊ शाळेत गेल्यावर आरोपी हा पिडीताला शाळेत न जाऊ देता आई-वडिलांना ठार मारण्याची धमकी देऊन तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवत असे व त्याबद्दल घरी किंवा कोणास सांगितल्यास पीडितेची बदनामी करण्याची धमकी देत असे.

काही दिवसानंतर आरोपीच्या पत्नीची निलंगा येथे बदली झाल्याने आरोपी व तिची पत्नी राहण्यासाठी निलंगा येथे गेले त्यानंतर आरोपी हा पिडीताच्या घरी कोणी नसताना वारंवार येऊन तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवत असे. आरोपी पिडीत सोबत वारंवार शारीरिक संबंध ठेवत असल्याने तिने सर्व हकीकत आई-वडिलांना सांगितली त्यावरून आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३१/ २०२० कलम ३७६ (२)(एन) (एफ) ३५४(अ),५०६ भादवी व बाल लैंगिक अत्याचार अधिनियम कलम ६, ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तत्कालीन पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर सचिन सांगळे यांचे मार्गदर्शनात एमआयडीसी पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक गणेश कदम, पोलीस अमलदार विशाल कोडे, मदतनीस महिला पोलीस अमलदार सुजाता कसपटे यांनी सदर गुन्ह्याचा अतिशय बारकाईने व जलद गतीने तपास करून आरोपी विरुद्ध भरपूर पुरावे गोळा करून आरोपी विरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. त्यावर माननीय अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश लातूर बी. सी. कांबळे यांनी जलद गतीने प्रकरण चालवून सदर प्रकरणात १२ सप्टेबर २०२३ रोजी निकाल दिला आहे.

सदर प्रकरणात पिडीताचा जवाब व इतर साक्षीदाराच्या आधारावर न्यायालयाने आरोपीस २० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली असून सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण ११ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली असून सरकार पक्षाची साक्ष ग्राह्य धरून अतिरिक्त जिल्हा न्यायालय, लातूर यांनी आरोपी सागर बाबासाहेब उर्फ धनंजय सूर्यवंशी यास पिडीताचा लैंगिक छळ केल्या प्रकरणी २० वर्षाची शिक्षा व एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणात विशेष शासकीय अभियोक्ता मंगेश महेंद्रकर यांनी सरकार पक्षातर्फे बाजू मांडली त्यांना जिल्हा सरकारी वकील संतोष देशपांडे यांचे सहकार्य लाभले. तसेच सध्याचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे हे सदर प्रकरणावर लक्ष ठेवून वेळोवेळी मार्गदर्शन व सूचना करीत होते.

तसेच सदर प्रकरणाचे तपासी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक गणेश कदम, कोर्टपैरवी चे काम पाहणारे ज्योतीराम माने, महिला पोलीस अमलदार कलमुकले यांनी कोर्ट कामकाजात सहकार्य केले.

# ट्रिपल इंजिन सरकारला दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचा डबा जड जातोय; वडेट्टीवारांचा सरकारवर घणाघात

मुंबई : राज्यातील एकीकडे आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर असताना मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणस्थळी सध्या राज्याचे मुख्यमंत्री पोहचले आहेत. याच दरम्यान विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी ट्वीट करत सरकारवर निशाणा साधला आहे. या ट्रिपल इंजिन सरकारला दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचा डबा जड जात असल्याचे म्हणत घणाघात केला आहे.

राज्यात यंदा आधीच उशिराने मान्सून सक्रीय झाला होता. तर मागील ऑगस्ट महिन्यांत पावसाने चागंलीच उघडीप दिली होती. त्यामुळे खरीपाची पिके संकटात आली होती. यामुळे शेतकरी चिंतित होता. दरम्यान आता सप्टेंबरच्या मध्यात पाऊस बरसत जरी असला तरी अद्यापही अनेक जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीतच राज्यात विविध समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आलेला आहे. या सर्वबाबींमुळे सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप आता विरोधकांकडून होत आहे. यावरून विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी ट्वीट करत या ट्रिपल इंजिन सरकारवर टीका केली आहे.

**काय म्हणाले वडेट्टीवार ट्वीटमध्ये**

विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी ट्वीटमध्ये म्हटले आहे की, कर्नाटकमधील काँग्रेस सरकार आज १९५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करणार आहे. मात्र, इकडे महाराष्ट्रात मात्र सरकार बेधुंद वागतंय. शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळालेला नाही. कर्जाचे पुनर्गठन सरकारने केलेले नाही. मग, महाराष्ट्र सरकार काय करतंय ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

**मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्र्यांवर थेट टीका**

वडेट्टीवार यांनी त्यांच्या ट्वीटमध्ये पुढे म्हटले की, जनतेच सरकार म्हणून थापा मारणारे मुख्यमंत्री निष्क्रिय बसून आहेत. तर अर्धे उपमुख्यमंत्री नुकतेच जपान फिरून आले आणि आता राजस्थान निवडणूक प्रचारात व्यस्त आहेत. दसुरे अर्धे उपमुख्यमंत्री त्यांच्या अखत्यारीत न येणाऱ्या खात्यांच्या बैठका घेऊन स्वतःच्या आमदारांसाठी निधी पळवण्यात व्यस्त आहे. असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट टीका केली आहे.

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचा डबा सोडला**

पुढे त्यांच्या ट्वीटमध्ये नमुद आहे की, दुष्काळाने शेतकरी होरपळतोय त्यांच्याकडे सरकारचं लक्ष कधी जाणार? सत्तेत बसून स्वतःची कामे करून घेण्याच्या नादात या सरकारने शेतकऱ्यांचा डबा आता सोडला असे चित्र स्पष्ट दिसत आहे. असेही त्यांनी त्यांच्या ट्वीटमध्ये नमुद केले आहे.

**जयंत पाटलांनीही वेधले होते लक्ष**

याआधी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी काही दिवसांपूर्वीच सरकारला पत्र लिहत शेतकरी आत्महत्येचे संकट महाराष्ट्रात गडद होऊ शकते असे म्हटले होते. त्यानंतरही सरकारने याबाबत काय ठोस पाऊल उपचलले नसल्याचे दिसत असल्याने वडेट्टीवारांनी आता सरकारवर टीका केली आहे.

# स्वच्छता अभियानातून मोदी सरकारची गडगंज कमाई, भंगार विकून मंत्रालये झाली करोडपती

एकीकडे भारत सरकारच्या मंत्रालयांमध्ये गेल्या काही वर्षात सुरू झालेल्या स्वच्छतेच्या अभियानामुळे सरकारला मंत्रालयांमध्ये मोकळ्या जागा मिळू लागल्या आहेत, तर दुसरीकडे सरकारच्या या मोहिमेमुळे मंत्रालय भंगार विकून करोडपती झाली आहेत. नोव्हेंबर २०२२ मध्ये सुरू झालेल्या आणि ऑगस्ट २०२३ पर्यंत सुरू असलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात, जुन्या फायली आणि रद्दी काढून मंत्रालयांना मोठा फायदा झाल्याचे डेटा दर्शवते.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालात असे म्हटले आहे की जलशक्ती मंत्रालयाने भंगार विकून १७ लाख रुपयांहून अधिक महसूल मिळवला आहे. जलसंपदा, नदी विकास कामे, गंगा संवर्धन विभागाच्या जुन्या फायली व कचरा काढून




५ हजार, ९०० चौरस फुटांपेक्षा जास्त जागा मोकळी करण्यात आली आहे. हे काम करण्यासाठी मंत्रालयाने ३२ हजार फायलींची पुनर्तपासणी केली आणि २४८ वेळा स्वच्छता मोहीम राबवली. यामध्ये नीती आयोगही मागे नाही, त्यांनी जवळपास ७५ टक्के फाईल्स निकाली काढल्या आहेत.

याशिवाय, अलीकडेच ऋ-२० च्या मोठ्या कामातून दिलासा मिळाल्यानंतर, परराष्ट्र मंत्रालयाने असेही म्हटले आहे की त्यांनी विशेष मोहीम २.० अंतर्गत उपाययोजना सुरू ठेवताना स्वच्छता मोहीम देखील सुरू केली आहे. या स्वच्छता अभियानांतर्गत, मुख्यालयातील परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या कार्यालयांमध्ये स्वच्छतेशी संबंधित विविध उपक्रम, नियम आणि कार्यपद्धतींचे पुनरावलोकन आणि सुलभीकरण, रेकॉर्ड व्यवस्थापन प्रणालीचा आढावा, जागेचा उत्पादक वापर, कचरा सामग्रीची विल्हेवाट लावणे, कामाच्या ठिकाणी अनुभव वाढवणे आणि भारतीय मोहिमा हाती घेतल्या जातील.

परदेशातील पोस्ट, प्रादेशिक पासपोर्ट कार्यालये, चए-शाखा सचिवालये आणि भारतातील स्थलांतरितांच्या संरक्षक कार्यालयाच्या नोडल अधिकाऱ्यांमार्फत मोहिमेला गती देण्यात आली. परराष्ट्र मंत्रालयाने ०१ ते १५ जानेवारी २०२३ या कालावधीत भारत आणि परदेशात ४२५ हून अधिक ठिकाणी स्वच्छता पंधरावडा साजरा केला. स्वच्छतेची खात्री करण्यासाठी विशेष मोहिमेची सुरुवात करण्यात आली, ज्यामध्ये कागदी कचरा, प्लास्टिक कचरा आणि ई-कचरा यांचे विलगीकरण आणि सुरक्षित विल्हेवाट लावण्यासाठी विशेष स्वच्छता मोहिमेचा समावेश आहे.

स्क्रॅप ओळखणे, काढून टाकणे आणि लिलाव करणे, अवांछित फाईली काढून टाकणे आणि चए- कार्यालयात अपंग लोकांच्या प्रवेशयोग्यतेचे पुनरावलोकन करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. स्वच्छता मोहीम सुरू ठेवत, परराष्ट्र मंत्रालय ०२ ऑक्टोबर २०२३ पासून सुरू होणाऱ्या विशेष मोहिम ३.० ची तयारी करत आहे.

# इंग्रजी माध्यमातील शाळांमध्ये धनगर विद्यार्थ्यांसाठीची प्रवेशसंख्या वाढवण्याचा सरकारचा निर्णय

मुंबई : धनगर समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळांमध्ये शिक्षणासाठी असलेली प्रवेशसंख्या वाढवण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला. नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षणासाठी असलेली ही योजना इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाही लागू करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी बैठकीत दिले. इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निवास, भोजन तसेच इतर शैक्षणिक सवलती देणारी आधार योजना लागू करणे, ओबीसी विद्यार्थ्यांच्या राज्यातील ७२ वसतिगृहांसाठी साहित्यखरेदी आणि वित्त व विकास महामंडळाच्या थेट कर्ज योजनेच्या अटी व शर्ती शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिल्या.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मागण्या आणि प्रलंबित विषयांबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या सचिव अंशू सिन्हा आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची सोय हा अत्यंत महत्वाचा विषय असून यासंदर्भात मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देखील महानगरे, शहरे आणि जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षण घेता आले पाहिजे. त्यासाठी त्यांना आदिवासी विकास विभागाची 'स्वयंम' योजना आणि सामाजिक न्याय विभागाची 'स्वाधार' योजनेच्या धर्तीवर 'आधार' योजना राबविण्यात यावी. या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात भत्त्याची रक्कम थेट हस्तांतरित करण्यात येईल. या योजनेसाठी विद्यार्थी संख्या निश्र्चित करून विभागाने सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी १०० विद्यार्थी क्षमतेच्या मुलांसाठी एक आणि मुलींसाठी एक अशी ७२ वसतिगृहे भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहेत. या वसतिगृहांसाठी लागणारे आवश्यक फर्निचर आणि इतर साहित्य खरेदीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्यास देखील




उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मान्यता दिली.

इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांमध्ये प्रवेशाबाबतच्या मुद्द्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, सद्यस्थितीत धनगर समाजातील साडे पाच हजार विद्यार्थ्यांना शहरांमधील इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये प्रवेश देण्यात येतो. मात्र, या योजनेच्या लाभासाठी येणाऱ्या अर्जांची संख्या पाहता त्यात वाढ करण्यात येईल. इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांमध्ये प्रवेशाची योजना इतर मागासप्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू करण्यात येईल. यासंदर्भात नामांकित शाळेची निवड, विद्यार्थी निवड करण्याबाबतचे निकष, धोरण आखण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांना शिक्षणाचा अधिकार कायद्यांतर्गत प्रवेश मिळणार नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी प्राधान्याने विचार करावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले आजच्या बैठकीत दिले आहेत.

राज्यातील इतर मागास प्रवर्गातील दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांकरिता स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत थेट कर्ज योजना राबविण्यात येते. या महामंडळामार्फत एक लाख रुपयांपर्यंत कर्ज देण्यात येते. मात्र, या योजनेच्या अस्तित्वातील अटी व शर्तीमुळे अत्यंत कमी प्रमाणात कर्जाचे वितरण होते. यास्तव अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या धर्तीवर अटी व शर्ती शिथिल करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी, तरुणांना शिक्षण, रोजगाराच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने इतर मागस बहुजन कल्याण विभागाने तातडीने प्रस्ताव सादर करावेत. येत्या डिसेंबरच्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांद्वारे यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून आजच्या बैठकीत देण्यात आली.

# भारतातील विविध राज्यांत साजरा केला जातो बैल पोळा



बैलपोळा सण श्रावण महिन्यात पिठोरी अमावस्येच्या दिवशी साजरा केला जातो. यंदा १४ सप्टेंबर रोजी हा सण साजरा करण्यात येत आहे. बैलपोळा हा विशेषतः विदर्भात भव्य पातळीवर साजरा केला जातो, विदर्भातील सीमेवर असलेल्या मध्य प्रदेश व तेलंगण सीमाभागात सुद्धा हा सण साजरा होतो. बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा हा सण साजरा केला जातो.

**भारतातील 'या' राज्यात साजरा केला जातो बैल पोळा**

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर बैलपोळा सण साजरा केला जात असून मध्यप्रदेश, छत्तीसगडमध्ये देखील शेतकरी वर्ग हा सण साजरा करतो. विदर्भातील सीमेवर असलेल्या मध्य प्रदेश व तेलंगण सीमांध्र भागात देखील पोळा साजरा केला जातो. पोळ्याच्या दिवशी ज्यांच्याकडे बैल नाहीत ते मातीच्या बैलांची पूजा करतात. तेलंगणाच्या उत्तरेकडे भागात बैलपोळा सणाला पुलाला अमावस्या म्हटले जाते. तर काही ठिकाणी 'बेंदूर' असे देखील म्हणतात. तर दक्षिणेत या सणाला 'पोंगल' आणि उत्तर व पश्र्चिम भारतात 'गोधन' असे म्हटले जाते.

**काय आहे बैल पोळ्याचे महत्त्व?**

बैलपोळा सण शेतकऱ्यांसाठी अंत्यत उत्साहाचा असतो. शेती हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात बैलांवर अवलंबून आहे. त्यामुळे बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा ग्रामीण भागातील लोक पोळा साजरा करतात. या दिवशी बैलाची पूजा करून गावभर त्याची वाजतगाजत मिरवणूक काढली जाते. गावात मिरवणूक झाल्यानंतर घरी महिला बैलांची पूजा करतात. काही ठिकाणी मातीच्या बैलांची पूजा करून पूजा करतात. या दिवशी गोड-धोड नैवेद्य बैलांना खाण्यासाठी ठोंबरा, पुरणपोळी, कढी, भजे यासारखे वेगवेगळे पदार्थ बनवतात.

# संसदेच्या विशेष अधिवेशनात 'या' मुद्यांवर होणार चर्चा; चार विधेयकेही मांडली जाणार

केंद्रातील मोदी सरकारने संसदेच्या विशेष अधिवेशनाची घोषणा केल्यानंतर विरोधकांकडून मोठ्या प्रमाणावर आरोप केले होते. या विशेष अधिवेशनासंदर्भात विरोधकांकडून अनेक तर्कवितर्क लावले जात होते. मात्र आता केंद्रातील मोदी सरकारने बोलावलेल्या संसदेच्या विशेष अधिवेशनाची विषय पत्रिका समोर आली आहे. यानुसार संविधान सभेपासून सुरू झालेल्या ७५ वर्षांच्या संसदीय प्रवासावर संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी चर्चा होणार आहे. याशिवाय चार विधेयकेही मंजूर करण्याचा प्रस्ताव आहे.

विषय पत्रिकेनुसार, १८ सप्टेंबर रोजी कागदपत्रे ठेवण्यासारख्या इतर औपचारिक कामकाजाव्यतिरिक्त ७५ वर्षांचा संसदीय प्रवासासह यश, अनुभव, आठवणी आणि तुम्ही काय शिकलात या विषयावर चर्चा आयोजित केली जाईल. संसदेत चर्चेदरम्यान चार विधेयकेही मांडण्यात येणार असून यामध्ये



अधिवक्ता दुरुस्ती विधेयक, प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ पीरियडिकल बिल, पोस्ट ऑफिस बिल आणि मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त नियुक्ती सेवा शर्ती विधेयक यांचा समावेश आहे.

विशेष अधिवेशनासंदर्भात बोलताना संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले की, पाच दिवसीय संसद अधिवेशन सुरू होण्याच्या एक दिवस आधी १७ सप्टेंबर रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली आहे. प्रल्हाद जोशी यांनी यासंदर्भात ट्वीटरवर पोस्ट केली आहे. त्यात त्यांनी म्हटले की, बैठकीचे निमंत्रण सर्व संबंधित नेत्यांना ई-मेलद्वारे पाठवले आहे.

दरम्यान, संसदेचे विशेष अधिवेशनाची घोषणा झाल्यानंतर कोणत्या विषयावर चर्चा होणार याविषयी अनेक तर्कवितर्क लावले जात होते. सरकार लोकसभा निवडणुका आधी घेऊ शकते, देशाचे नाव बदलून इंडिया ऐवजी भारत असे होऊ शकते, एक राष्ट्र-एक निवडणूक, लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के सवलत अशा अनेक मुद्द्यांवर विशेष अधिवेशनात चर्चा होऊ शकते, अशी शक्यता आहे. यासाठी विशेष अधिवेशन बोलावण्याचा हेतू सरकारने स्पष्ट करावा, अशी मागणी विरोधकांकडून सातत्याने होताना दिसत आहे.

# श्रवणहानी टाळण्यासाठी संशोधन!

एका विशिष्ट वयानंतर अंदाजे ४० टक्के लोकांना काही प्रमाणात कमी ऐकू यायला लागते. हे प्रमाण ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या प्रौढांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येत असले तरी जेव्हा लोक त्यांच्या ४० ते ५० च्या दशकात असतात तेव्हा किंवा त्याहीपेक्षा खूप लवकर सुरू होऊ शकते. हा काळजीचा मुद्दा आहे. कारणे काहीही असोत त्यावर उपाय शोधणे महत्त्वाचे! बरे होण्याच्या पलीकडे जाण्याआधी वापरता येतील अशी व्यवहार्य तंत्रे शोधण्याचा संशोधक प्रयत्न करीत आहेत.


सामान्यत: शुद्ध-स्वर ऑडिओमेट्री वापरून श्रवण कमी झाल्याचे निदान केले जाते. एखाद्या व्यक्तीला वेगवेगळ्या ध्वनी स्तरांवर शुद्ध स्वर ऐकवला जातो. ती व्यक्ती खूप शांत होण्याआधी ज्या स्तरावरचा आवाज ऐकू शकते ती आवाजाची पातळी यातून समजते. या स्तराला श्रवणसीमा म्हटले जाते. जर श्रवणसीमा खूप जास्त असेल म्हणजे स्वर ऐकण्यासाठी टोनची पातळी तुलनेने तीव्र असणे आवश्यक आहे. अशा वेळी श्रवणयंत्र वापरायला सांगितले जाते. असे असले तरी वय-संबंधित श्रवणहानी कालांतराने विकसित होते. हे वय आता ४० ते ५० झाले आहे. या वयात अनेकांना रेस्टॉरंट्स, मॉल्स आणि इतर सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणांसारख्या गोंगाटाच्या वातावरणात बोलणे समजण्यात अडचणी येऊ लागतात. या श्रवणविषयक अडचणी बहुतेक वेळा अधिक लक्षणीय श्रवण कमी होण्याचे पूर्वसूचक असतात.

श्रवणविषयक समस्या लवकर ओळखण्यासाठी संशोधक अतिरिक्त निदान साधने विकसित करीत आहेत जी रुणाच्या श्रवणातील सूक्ष्म पैलूंना पकडण्यासाठी अधिक चांगली आहेत. ही उपकरणे काही शारीरिक चिन्हे सूचित करतात. जसे एखादी व्यक्ती गोंगाटाच्या वातावरणात उच्चार ओळखण्याचा जास्त प्रयत्न करीत आहे हे जर यशस्वीरित्या ओळखले तर मोजता येण्याजोगे शारीरिक संकेत नवीन रुग्णांमध्ये आणि श्रवणहानी झालेल्या रुग्णांमध्ये चांगले मूल्यांकन करण्यासाठी डॉक्टरांना मदत करतात. भूतकाळातील अभ्यासांनी प्रयत्नपूर्वक ऐकताना उद्भवणार्या भिन्न शारीरिक प्रतिक्रियांवर प्रकाश टाकला आहे. एक म्हणजे डोळयाच्या बाहुलीच्या आकारात बदल. हे बदल प्युपिलोमेट्री वापरून मोजले जाऊ शकतात. आपल्याला माहीत आहे की जेव्हा एखादी व्यक्ती आकलनविषयक कार्य करते तेव्हा डोळ्याच्या बाहुलीचा आकार वाढतो. जसे की अनेक संख्या लक्षात ठेवताना. गेल्या दशकातील संशोधन सांगते की जेव्हा व्यक्ती प्रयत्नपूर्वक बोलणे ऐकत असते तेव्हा डोळ्याच्या बाहुलीचा आकार वाढतो.

डोळयाच्या बाहुलीच्या आकाराचे मोजमाप करण्यात समस्या म्हणजे ती प्रकाशातील बदलांसाठी अतिशय संवेदनशील असते. आपले वातावरण उजळ होते तेव्हा डोळ्याची बाहुली लहान होते. डोळयाच्या बाहुलीच्या मापनावर कॅमेर्याचा बाहुलीशी असणार्या सापेक्ष कोनाचाही परिणाम होतो. जसे एखादी व्यक्ती डावीकडे किंवा उजवीकडे पाहते तेव्हा बाहुलीचा आकार बदलला नसला तरी बदललेला दिसतो. या सगळ्या गोंधळामुळे श्रवण चाचणीदरम्यान रुणाच्या डोळ्याच्या बाहुलीचा आकार मोजणे योग्य नसते. यामुळे हर्मन आणि एम. एरिक कुई यांनी प्रयत्नपूर्वक ऐकणे शोधण्यासाठी पर्यायी धोरण शोधले आहे.

प्राण्यांमधील श्रवणविषयक कॉर्टेक्स (ध्वनीला प्रतिसाद देणारा मेंदूचा भाग) तपासणार्या संशोधनात आढळले की जेव्हा प्राणी त्यांची हालचाल कमी करतात तेव्हा श्रवणविषयक कॉर्टेक्स आवाजासाठी अधिक संवेदनशील बनते. अशा प्रकारे डोळयांच्या हालचाली कमी होणेदेखील उच्च श्रवणविषयक संवेदनशीलतेशी संबंधित असू शकते. या गृहितकाची चाचणी घेण्यासाठी हर्मन आणि कुई यांनी १८ ते ३५ वयोगटातील २६ व्यक्तींची तपासणी केली. अधिक प्रयत्नांनी ऐकत असताना या सहभागींच्या डोळयांच्या हालचाली कमी झाल्या की नाही हे निर्धारित करणे त्यांचे उद्दिष्ट होते. प्रयोगशाळेत आलेले सहभागी साऊंड बूथमध्ये आरामशीर खुर्चीवर बसले. त्यांनी आपले डोके हनुवटीवर विश्रांतीमध्ये ठेवले, ज्यामुळे व्यक्तीचे डोके स्थिर होण्यास मदत होते आणि संगणक मॉनिटरच्या समोर बसले. त्यांनी हेडफोन घातले होते. त्यावर संभाषण ऐकवले. सहभागींनी संगणकाच्या स्क्रीनवर कुठे पाहिले हे निर्धारित करण्यासाठी आय ट्रॅकर, कॅमेरा-उपकरण वापरले जे एखाद्या व्यक्तीच्या डोळ्यांचा मागोवा घेऊ शकते.

वेगवेगळ्या चाचण्यांमध्ये सहभागींनी हेडफोन्सच्या सेटवर वाक्ये आणि बोलणे ऐकले.



प्रत्येक चाचणीमध्ये त्यांनी समोरील स्क्रीनवर काहीतरी वेगळे पाहिले. जसे स्थिर बिंदू, हलणारे बिंदू, अनेक हलणारे ठिपके किंवा रिकामा स्क्रीन. त्यांचे लक्ष केंद्रित करण्याचे ठिकाण किंवा वस्तू बदलून ते काय पाहत आहेत याला महत्त्व न देता सहभागींच्या डोळ्यांच्या हालचालींमध्ये बदल झाले आहेत की नाही हे त्यांना पाहायचे होते. सहभागींना संगणकाच्या स्क्रीनवर त्यांना आवडेल तिथे पाहण्यास सांगितले. काही वेळा मागील आवाज कमीत कमी ठेवण्यात आला, जेणेकरून सहभागींना काय बोलले आहे हे समजण्यासाठी थोडेच प्रयत्न करावे लागतील, तर काही वेळा मागील आवाज तीव्र ठेवले जेणेकरून उच्चार समजून घेण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतील. सहभागींच्या डोळ्यांच्या हालचाली नोंदवल्या.

विश्र्लेषणात हर्मन आणि कुई यांनी डोळ्यांच्या हालचालींच्या दोन भिन्न पैलूंवर लक्ष केंद्रित केले. नजर स्थिरीकरण कालावधी आणि टक लावून पाहणे हे ते दोन पैलू होय. स्थिरीकरणामध्ये व्यक्तीचे डोळे दिलेल्या वस्तू किंवा बिंदूवर किती काळ स्थिर राहतात हे मोजले, तर दुसर्यात व्यक्तीने स्क्रीनवर किती वेळा आपली नजर हलवली हे मोजले. यात आढळले की ऐकण्याच्या अधिक परिश्रमाच्या परिस्थितीत म्हणजेच पार्श्र्वभूमीच्या आवाजाचे प्रमाण अधिक असताना अधिक अनुकूल ऐकण्याच्या परिस्थितीच्या तुलनेत व्यक्तीच्या डोळ्यांची हालचाल कमी होते आणि दीर्घ स्थिरीकरण कालावधीमध्ये परावर्तित होते.

विविध दृश्य सादरीकरण परिस्थितीसाठी ऐकण्याचे प्रयत्न करताना डोळ्यांच्या हालचाली कमी होतात. वेगवेगळ्या परिस्थितीत ऐकण्यासाठी सहभागी किती प्रयत्न करत आहेत हे ठरवण्यासाठी डोळ्यांच्या हालचालींच्या नोंदीचे महत्त्व आहे हे यातून सिद्ध होते. भविष्यात क्लिनिकल सेटिंग्समध्ये श्रवणहानी शोधण्यासाठी नवीन चाचण्या तयार करण्यासाठी प्रयत्नपूर्वक ऐकण्याचा हा उपाय वापरला जाऊ शकतो. अभ्यास दर्शवितो की ऐकण्याचा प्रयत्न डोळ्यांच्या हालचाली कमी होण्याशी संबंधित आहे.

ऐकण्याच्या प्रयत्नांतर्गत डोळ्यांच्या हालचालींमध्ये होणारे बदल डोळ्याच्या बाहुलीच्या आकारातील बदलांशी कसे संबंधित आहेत हे अजून चांगल्या प्रकारे समजून घेणे आवश्यक आहे. कदाचित दोन्ही उपाय ऐकण्याच्या प्रयत्नांचे वेगवेगळे पैलू पकडतात. उदाहरणार्थ अधिक स्वयंचलित विरुद्ध अधिक ऐच्छिक शारीरिक प्रयत्न. हे ऐकण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापकपणे समजण्यास मदत करतील.

पुढच्या अभ्यासात हर्मन आणि कुई डोळयांच्या हालचालींमधील घट कमी करण्याच्या पद्धतींचा शोध घेतील. यामुळे अशा कपातीला प्रोत्साहन देणार्या आव्हानांचा चांगल्या प्रकारे अंदाज लावता येईल. याशिवाय ते डोळ्यांच्या हालचाली आणि प्रयत्नपूर्वक ऐकणे यामधील दुवा शोधण्याच्या प्रयत्नात आहेत, जेणेकरून ते ऐकण्याच्या प्रयत्नांमधील फरक ओळखू शकतील आणि त्याचा उपयोग करून घेऊ शकतील. प्रयत्नपूर्वक ऐकणे श्रवणहानीशी नेहमीच जोडले जाऊ शकत नाही. उदाहरणार्थ ते अस्खलितपणे बोलत नसलेल्या भाषेतील बोलणे ऐकताना किंवा वाक्यरचनात्मकदृष्ट्या जटिल किंवा अस्पष्ट वाक्यांवर प्रक्रिया करताना लोक जास्त प्रयत्नपूर्वक ऐकू शकतात.

जेव्हा श्रवणयंत्राने उपचार केले जातात तेव्हा डोळ्यांच्या हालचालींमुळे ऐकण्याचा प्रयत्न कमी होतो का हे तपासण्याचा पुढील प्रयत्न असेल. कारण यामुळे एखाद्या व्यक्तीला त्यांच्या श्रवणयंत्राचा किती फायदा होतो याचे मूल्यांकन करता येईल. सुरुवातीला फक्त तरुण निरोगी प्रौढांच्या डोळ्यांच्या हालचालींची तपासणी केली. पुढे वृद्ध लोकांच्या तपासण्या महत्त्वाच्या आहेत. कारण यांच्यासाठी हा नवीन दृष्टिकोन सर्वात उपयुक्त असू शकतो.

-सुजाता बाबर

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशित केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# कीटकनाशके फवारणी करण्याआधी महत्त्वाची कामे



अकराशे रुपयांची DAP बॅग जितकी काळजीपूर्वक आणि व्यवस्थित पुसून वापरतो तसे ५०० रुपयांचे कीटकनाशक हाताळताना उदासीनता दिसते. त्यामुळे ही गोष्ट गांभीर्याने घेतली पाहिजे कारण वरील फोटो सत्य परिस्थिती दर्शवतो.

फवारणी घेण्याआधी किडीची ओळख, आर्थिक नुकसान पातळी, कीटकनाशकांचे लेबल क्लेम, वापरण्याचे प्रमाण/पद्धत, किटकनाशकाचे फॉर्म्युलेशन, संरक्षण कपडे, योग्य फवारणी अवजारे, या सर्व गोष्टी लक्ष्यात घेणे गरजेचे असते.

सर्वात पहिली गोष्ट किडींची ओळख, कोणत्या किडीसाठी आपण फवारणी घेतोय हे माहिती असले पाहिजे.

किडीच्या सर्वच्या सर्व अवस्थांचा अभ्यास नसला तरी चालेल पण अळी अवस्था कशी दिसते किंवा किमान कोणत्या पिकामध्ये कोणती कीड येते इतकी माहिती असलीच पाहिजे. जसे पाने खाणारी अळी-सोयाबीन, अमेरिकन लष्करी अळी- मका, घाटेअळी- हरभरा, कपाशी, खोडकिडा-ऊस, मक्का अशा प्रकारच्या विविध किडी.

कीड ओळखल्यानंतर पिकामधील किडीचे प्रमाण, त्यावरून आर्थिक नुकसान पातळी ठरवता येते. कीटकांचे एकात्मिक व्यवस्थापन करणे आता काळाची गरज बनली आहे. कीटकनाशकांचे अवशेष, दुष्परिणाम, आरोग्यावर होणारा परिणाम त्यामुळे कीड आर्थिक नुकसान पातळीच्या वर जातेय असं जाणवल्यासच रासायनिक फवारणीचा पर्याय निवडावा.

आर्थिक नुकसान पातळी:- किडींची कमीत कमी संख्या जी पिकाचे आर्थिकदृष्ट्या नुकसान करण्यास कारणीभूत ठरते.

किडीची ओळख झाली, किडीचे एकात्मिक व्यवस्थापन करून सुद्धा कीड आर्थिक नुकसान पातळी ओलांडतेय असे जाणवले त्यामुळे रासायनिक कीटकनाशके फवारणीचा निर्णय झाला. आता किटकनाशक कोणते वापरावे? प्रत्येक किडीसाठी व पिकासाठी प्रमाणित व शिफारशीत किटनाशके बाजारात उपलब्ध आहेत. त्यामधुन आपण कोणत्या पिकामध्ये व कोणत्या किडीसाठी फवारणी घ्यायची आहे हे कृषीमित्राकडून किंवा शेतीसेवा केंद्रामध्ये, एखाद्या अभ्यासू व्यक्तिकडून कीटकनाशकांच्या योग्यतेची खात्री करून घ्यावी.

कीटकनाशकांच्या योग्यतेची खात्री पटवण्याचा आणखी एक पर्याय म्हणजेच लेबल क्लेम होय. लेबल क्लेम म्हणजे एका विशिष्ट किडीच्या नियंत्रणासाठी विशिष्ट पिकामध्ये कीटकनाशकाचा शिफारशीत प्रमाणात वापर होय. जर आपण कीटकनाशकांच्या लेबल क्लेम मध्ये उल्लेख नसलेल्या पिकामध्ये किंवा किडीवर कीटकनाशक फवारले तर कीड निर्मूलनाची शास्वती नसते. त्यामुळेच गैरवापर टाळण्यासाठी लेबल क्लेम महत्वाची भूमिका बजावते.

लेबल क्लेम मध्ये शिफारस केलेली मात्राच आपण फवारणी करताना वापरली पाहिजे. विविध निकषांच्या आधारावर, अवशेष राहू नयेत, किडीमध्ये प्रतिरोधक क्षमता तयार होऊ नये यासाठी हे प्रमाण निच्छित केंद्रीय कीटकनाशक नियामक मंडळ यांच्याकडून प्रमाणित केले गेलेले असते.

फवारणीआधी फवारणी पंप-नोझल हे व्यवस्थित दुरुस्त करून तपासून घ्यावेत. संरक्षक कपडे वापरने कधीही फायद्याचे ठरते. खराब अवजारे वापरल्यास विषबाधेचा धोका वाढतो. तसेच कीटकनाशकाचा त्वचेशी संपर्क आल्यामुळे खाज-जळजळ, तोंडात गेल्यास उलटी अशी लक्षणे दिसू शकतात.

अतिरिक्त खर्च कमी करण्यासाठी, गैरप्रकार टाळण्यासाठी, योग्य पद्धतीने कीड नियंत्रणात आणण्यासाठी वरील गोष्टी किटकनाशक फवारणी आधी लक्ष्यात घेणे अत्यंत महत्वाचे आहे.




# कोथिंबीर पिकामध्ये येणारे महत्वाचे रोग

तर आज आपण कोथिंबीरीमध्ये येणाऱ्या प्रमुख रोगांविषयी चर्चा करणार आहोत.

कोथिंबीर:-coriander sativum

१) भुरी (Powdery mildew):-रोग लक्षणे:-ते कोवळ्या पानावर भागावर लहान, पांढरे, पावडरचे ठिपके दिसतात नंतर आकाराने वाढतात आणि पानांच्या पृष्ठभागाचा मोठे होत-होत पूर्ण पान व्यापतात.

प्रभावित पाने आकारात कमी होतात आणि विकृत होतात.

या रोगामुळे प्रभावित झाडांमध्ये बीज निर्मिती होऊ शकत नाही.

प्रसार :-बुरशी बीजाणूंच्या(क्लीस्टोथेशीयाच्या) रूपात पिकाच्या अवशेषात टिकून राहू शकते आणि हवेद्वारे लांब अंतरावर प्रसार होतो.

अनुकूल परिस्थिती:रोगाची सुरवात उच्च आर्द्रता आणि मध्यम तापमान (ढगाळ हवामान) असे अनुकूल असताना होत असते; सावली असलेल्या भागात संसर्ग झपाट्याने पसरतो.

विल्ट/मर रोग लक्षणे:-

शेंडा सुकून जातो, पाने करपल्या सारखी दिसतात.

रोप उपसल्यास मुळाचा बदललेल्याचा जाणवतो.

ज्या रोपांना प्रादुर्भाव कमी प्रमाणात झालेला असतो त्या मध्ये पाने वाळून रोपांची वाढ थांबते.



अनेकवेळा झाडाला बिया धरत नाही. जरी बिया धरल्या तर हलक्या व कमी प्रतीच्या असतात.

पिकामध्ये सुरवातीस जर या संक्रमण झाले तर गंभीर नुकसान होऊ शकते.

प्रसार:-हा रोग मातीजनीत बुरशीमुळे होतो आणि प्राथमिक संसर्ग मातीमध्ये असलेल्या बीजाणूंमुळे होतो. मुळाद्वारे या रोगाचा संसर्ग रोपास होतो

अनुकूल परिस्थिती:-जास्त मातीचा ओलावा किंवा मातीचे तापमान या गोष्टी संक्रमणासाठी अनुकूल आहे.

खोड/पाने फुगणे:-रोगाची लक्षणे:-हा रोग फुले, पान, देठ, तसेच फळावर गाठीच्या स्वरूपात दिसून येतो. संक्रमित पानांच्या शिरा सुजलेल्या स्वरूपाचे दिसतात. या गाठी नंतर फुटतात त्यामुळे गंभीर लक्षणे दिसायला लागतात.

गंभीरपणे प्रभावित झालेली झाडामध्ये मर होऊ शकते. मातीमध्ये जास्त प्रमाणात ओलावा असल्यास, विशेषत: जास्त सावली असलेल्या ठिकाणी, जेव्हा स्टेम कडक आणि रसाळ राहण्यास अपयशी ठरतो, तेव्हा गाठी असंख्य असतात.

प्रसार:-हा रोग मातीजनीत बुरशीमुळे होतो आणि मातीमध्ये पडून असलेले बीजाणू प्राथमिक संक्रमणाचे कारण ठरतात. बुरशीचे काही महिन्यापासून ३ वर्षांपर्यंत वर्षे विश्रांतीसाठी बीजाणू म्हणून जमिनीत टिकून राहू शकतो.

अनुकूल परिस्थिती:-तुलनेने जास्त मातीचा ओलावा आणि मातीचे तापमान संक्रमणासाठी अनुकूल आहे.

**संकलन - महेश कदम हातकणंगले**

# कागदी लिंबाच्या हस्त बहराचे नियोजन



कागदी लिंबाला फेब्रुवारी ते मे महिन्याच्या दरम्यान बाजारपेठेत चांगली मागणी असते. यासाठी हस्त बहराचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. लिंबूवर्गीय झाडांना बहर येण्याकरिता झाडाची वाढ करणाऱ्या अन्नद्रव्यांचा संचय होणे गरजेचे आहे. झाडाच्या फांद्यामध्ये अन्नद्रव्यांचा प्रमाणबद्ध संचय झाल्यानंतर पोषक हवामान मिळताच बहराची फुले नवतीसोबत दिसू लागतात. हस्त बहरात शास्त्रीय पद्धतीने मशागत, खत व ओलीत व्यवस्थापन, संजीवकांचा वापर केल्यास उत्पादनात वाढ शक्य आहे.

बहराचे वेळापत्रक : आंबिया बहर:फुलधारणा जानेवारी ते फेब्रुवारी दरम्यान होऊन फळांचे उत्पादन जून ते ऑगस्ट या महिन्यात मिळते. परंतु या काळात बाजारात फळांना फार कमी दर असतो.

मृग बहर:फुलधारणा जून-जुलै महिन्यात होऊन फळांचे उत्पादन नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये मिळते. फळांवर चकाकी असते, मात्र अपेक्षित दर मिळत नाही.

हस्त बहर: फुलधारणा ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान होते. फळे मार्च-मे महिन्यामध्ये काढणीस येतात. या काळात फळांना मागणी आणि दरही चांगला असतो.

हस्त बहराचे नियोजनः लिंबू झाडावर मृग बहराची फळे नसावीत. याकरिता झाडाला मृग बहार न येण्याची सवय लावणे जरुरी असते. असे केल्याने हस्त बहार नियमित येत राहील.

जिबरेलीक आम्लाच्या वापरामुळे मृग बहार फुटण्यास प्रतिरोध होऊन फुलधारणेऐवजी झाडाची शाकीय वाढ होते. मृग बहाराची फुले उशिरा म्हणजेच जून-जुलै ऐवजी ऑक्टोबर-नोव्हेंबर म्हणजेच हस्त बहारात फुटण्यास मदत होते. हस्त बहर धरण्यासाठी लिंबू बागायतदारांनी जून महिन्यात ५० मिलि जिबरेलीक आम्ल प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी केलेली आहे. त्यामुळे झाडाला विश्रांती मिळते. विश्रांती दिल्यामुळे झाडे सुप्त अवस्थेत जातात. या कालावधीमध्ये कर्ब आणि नत्राचा संचय होतो. (ग्रेस्को शिफारस) झाडांना १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर या कालावधीत पाण्याचा ताण द्यावा लागतो. ताणाच्या कालावधीत पाऊस येत असल्याने योग्य प्रकारे ताण बसत नाही. यासाठी प्रति लिटर पाण्यात एक ग्रॅम क्लोरमेक्वाट क्लोराईड मिसळून फवारणी करावी.

(ग्रेस्को शिफारस) आवश्यकतेनुसार पुन्हा १५ दिवसांनी हीच फवारणी करावी. क्लोरमेक्वाट क्लोराईड हे संजीवक जिबरेलीक आम्लाचे प्रमाण कमी करते. त्यामुळे झाडांची वाढ थांबते, फुलोऱ्यात रूपांतर होण्यास मदत होते. कर्ब आणि नत्राचा संचय योग्य गुणोत्तर प्रमाणात होतो.

अन्नद्रव्य व्यवस्थापनः हस्त बहाराचे नियोजन केल्यावर झाडावर हंगाम नसताना देखील फळांची संख्या अधिक राखली जाते. यामुळे झाडांची होणारी झीज भरून काढणे, झाडांमधील अन्नद्रव्यांचे प्रमाण संतुलित राखण्यासाठी योग्य वेळी अन्नद्रव्यांच्या योग्य मात्रेचे नियोजन करावे.

सहा वर्ष आणि त्यावरील झाडांना ४० किलो शेणखत, ६०० ग्रॅम नत्र, ३०० ग्रॅम स्फुरद आणि ३०० ग्रॅम पालाश प्रति झाड द्यावे.

जुलै महिन्यात दिलेले प्रति झाड ४० किलो शेणखत पावसामुळे जमिनीत चांगले कुजते. त्यामुळे सूक्ष्म अन्नद्रव्ये उपलब्ध होतात.

पाण्याचा ताण तोडताना, प्रतिझाड ३०० ग्रॅम नत्र, ३०० ग्रॅम स्फुरद आणि ३०० ग्रॅम पालाश द्यावे. उरलेल्या ३०० ग्रॅम नत्राची मात्रा बहर आल्यापासून साधारणपणे एक महिन्याने द्यावी. हा काळ फळांच्या वाढीचा असल्यामुळे झाडाची नत्राची गरज वाढते. स्फुरद व पालाशची अतिरिक्त गरज, पालाशची मात्रा अगोदर देवूनही मातीद्वारे उशिरा उपलब्ध होत असल्याने या कालावधीत आवश्यकतेनुसार पूर्ण होते.

बहर येण्याकरिता ताण दिल्यानंतर होणारी फुलगळ रोखण्यासाठी अन्नद्रव्यांची त्वरित उपलब्धता होणे आवश्यक असते. मातीद्वारे दिलेली अन्नद्रव्ये त्वरित उपलब्ध होत नाहीत. याकरिता ऑक्टोबर महिन्यात पाण्याचा ताण तोडताना, प्रतिलिटर पाण्यात १० ग्रॅम पोटॅशिअम नायट्रेट मिसळून फवारणी करावी. यामुळे नत्र व पालाशची गरज त्वरित पूर्ण केली जाते.

फुलधारणेच्या काळात झाडांस आवश्यक असलेल्या सूक्ष्म अन्नद्रव्यांची उपलब्धता झाल्यामुळे अपेक्षित फुलधारणा होऊन फुलगळतीवर नियंत्रण दिसून येते.

फवारणी: प्रति लिटर पाणी

१) झिंक उपलब्धता: झिंक सल्फेट ५ ग्रॅम

२) बोरॉन उपलब्धता: बोरॉन १ ग्रॅम

३) ताण तोडताना: चिलेटेड स्वरूपातील सूक्ष्म अन्नद्रव्य मिश्रण २ ग्रॅम

ओलित व्यवस्थापन: वाफ्यातील ओलावा टिकवून ठेवण्याकरिता, वाफ्यामध्ये वाळलेल्या गवताचा ५ सेंटिमीटर जाडीचा थर द्यावा. त्यामुळे जमिनीचे तापमान संतुलित राहून प्रत्येक महिन्याला एका पाण्याच्या पाळीची बचत होते. जमिनीतील उपयुक्त जिवाणू सक्रिय होऊन मुळांचे अन्नद्रव्य घेण्याचे कार्य वाढते. फळगळ कमी होऊन वाढ चांगली होते.

ठिबक सिंचन पद्धतीने पाणी दिल्यास ३० टक्के पाण्याची बचत होते. फळांची प्रत उत्तम आणि झाडावर सल सुद्धा कमी आढळते.

दुहेरी आळे पद्धतीत पाण्याचा आणि खोडाचा संपर्क न आल्यामुळे बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव होत नाही.

बागेतील ओलावा ४० टक्के झाल्यावर, ओलीत केल्यास फळांची प्रत उत्तम राहून उत्पादनात वाढ होते. ठिबक सिंचन पद्धतीने पाणी देताना बाष्पोत्सर्जनाच्या ९० टक्के पाणी व शिफारशीत खताच्या मात्रेच्या ८० टक्के खते (१४० ग्रॅम नत्र, २४० ग्रॅम स्फुरद आणि २४० ग्रॅम पालाश प्रति झाड) द्यावीत. यामुळे फळे मोठ्या आकाराची व दर्जेदार होऊन उत्पादनात चांगली वाढ होते.

(टीप : स्ट्रेप्टोमायसीन हे संक्षिप्त नाव वरील लेखात घेतले असले तरी या प्रतिजैविकातील सक्रिय घटक पुढीलप्रमाणे आहेत. स्ट्रेप्टोमायसीन सल्फेट ९० टक्के अधिक टेट्रासायक्लीन हायड्रोक्लोराइड १० टक्के.)

संपर्क :डॉ. सुरेंद्र पाटील, ९८८१७३५३५३

उद्यानविद्या विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

# तंबाखु रोपावस्थेतील कुज

तंबाखू लागवडी आधी रोपे तयार करून घ्यावी लागतात. याच रोप तयार करताना रोप 'लागणे' म्हणजेच रोप कुजण्याची समस्या फार मोठ्या प्रमाणात भेडसावते.

ही समस्या मुख्यतः बुरशीजन्य रोगामुळे उद्भवते.

कारक बुरशी:-Pythium spp, Olpidium brassicae, Thielaviopsis basicola या बुरशींमुळे रोप कुज होऊ शकते.

प्रादुर्भाव लक्षणे:-बियाणे बेड वर टाकल्यानंतर ३-४ दिवसांनी पूर्णपणे उगवून आलेले दिसून येतात. कारक बुरशी हा माती जनीत असल्याने त्यांचा प्रादुर्भाव हा मुळाकडून देठाकडे दिसून येतो. काही ठिकाणी पाने तपकिरी पिवळे पडलेली दिसतात. ज्या ज्या ठिकाणी जास्त दाट बी पडलेले आहे त्या ठिकाणी पाने कुजायला चालू होतात.

रोप उपसल्यास मुळे पूर्णपणे तपकिरी पडली असल्यास Olpidium brassicae या कारक बुरशीचा प्रादुर्भाव समजावा. ज्या ठिकाणी बेड वर पाणी जास्त वेळ साचते तिथे जास्त प्रादुर्भाव पहायला मिळतो.



पाने मऊ, ओलसर, तपकिरी होऊन कुजत असतील तर Pythium spp या बुरशीचा प्रादुर्भाव असतो.

प्रतिबंधक व नियंत्रण उपाय:- उन्हाळ्यामध्ये जमिनीची नांगरट करून जमीन चांगली तापू द्यावी. मातीचे तापमान वाढून बुरशी नष्ट होईल.

बेडची उंची किमान १५ ला इतकी असावी. पाण्याचा निचरा होण्यासाठी दोन्ही बाजूने गटारी असाव्या बियाणे बेड वर टाकण्याआधी खतामधील केर-कचरा, मागील पिकाचे अवशेष, गवताची मुळे वेचून नष्ट करावीत.

बेडवर रोपांची गर्दी टाळण्यासाठी ३.५ किलो बियाणे/प्रति हेक्टरी या प्रमाणात पसरावे.

बेडवर ओलसरपणा नियमित असावा.

अति प्रमाणात पाणी देणे टाळावे. नियमित व योग्य प्रमाणात पाणी द्यावे. बेडवर खते टाकताना त्यामध्ये स्पर्धजन्य बुरशीनाशके मिसळावीत. उदा. साफ (कार्बेन्डाझिम१२%+मॅन्कोझेब 63%WP)

प्रमाणित बुरशी नाशके:- बोर्डेक्स मिक्स०.४%(Copper sulphate 40 gm+lime/ M w Z m 40gm+10lit.water)

कॉपर ऑक्सिक्लोराईड ५०%WP 20 gm/10 lit

वरीलपैकी कोणतेही फवारणी नॉर्मल वातावरण असताना दर चार दिवसांनी घ्यावी. दमट आणि ढगाळ वातावरणात दर दोन दिवसांनी फवारणी घ्यावी.

३.Ridomil MZ 72 WP(मेटलेक्सिल ४% + मॅन्कोझेब ६४%) 20gm / 10 lit ही फवारणी उगवणी नंतर २०-३० दिवसानंतर घ्यावी. पण २ वेळे पेक्ष्या जास्त किंवा प्रमाणा पेक्षा औषध वापरू नये

४.फेनामोडन १०%+ मॅन्कोझेब५०% ३०सा/१० श्ली उगवणी नंतर २०-३० दिवसानंतर घ्यावी.

माहिती संकलन:- IPM SCHOOL

संदर्भ:-केंद्रीय तंबाखू संशोधन संस्था, राजामुन्द्री, आंध्रप्रदेश

# तूर पिकामधील किडींचे एकात्मिक कीड व्यवस्थापन



जमिनीस विश्रांती देण्यासाठी, किडीच्या जमिनीतील विविध अवस्था जसे, कोष नष्ट करण्यासाठी, बुरशी, सूत्रकृमी यांचे अवशेष नष्ट करण्यासाठी उन्हाळ्यात नांगरट करावी. जमीन किमान एक ते दीड महिना तापू द्यावी. .सापळा पीक, बॉर्डर क्रॉप म्हणून ज्वारी, बाजरी, झेंडू किंवा मका मुख्य पिकाच्या बाजूने चार ओळीत घ्यावा. तुरीमधील किडी ज्या पिकामध्ये येत नाहीत त्या पीका सोबत फेरपालटणी करावी. .पिकाच्या योग्य वाढीसाठी तसेच पीक निरोगी रहावे यासाठी शेणखते ४ टन एकरी/व्हर्मीकंपोस्ट २ टन एकरी टाकावीत. व्हर्मीकंपोस्ट टाकताना त्यामध्ये ट्रायकोडर्मा ही मित्रबुरशी मिसळावी. .कीड व रोगांना सहनशील किंवा प्रतिरोधक असणाऱ्या प्रमाणित, रोगमुक्त वाणाची लागवडीसाठी निवड करावी. रासायनिक खतांचा समजस वापर करावा. अतिवापर टाळावा.

**पीक वाढीदरम्यान**

**यांत्रिक पद्धती:-**

१.रोगग्रस्त/कीडग्रस्त भाग वेळीच कट करून पिकाबाहेर नष्ट करावेत.

२.लहान अळी व अंडीपुंज दिसताच नष्ट करावेत.

३.रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी व पिकामधील प्रमाण तपासण्यासाठी सुरवातीपासून एकरी किमान ४० पिवळे व निळे चिकट सापळे लावावेत.

४.शेंगा पोखरणाऱ्या( Marucca vitrata) अळीसाठी व शेंगा खाणाऱ्या अळी (Helicovorpa armigera) साठी किमान एकरी १० फेरोमोन ट्रॅप लावून घ्यावेत. जेणे करून पिकातील किडींचे प्रमाण समजेल व पुढे होणाऱ्या किडीस अटकाव होईल.

५.सापळ्यांसोबत एकरी १० पक्षी थांबे उभे करावेत. त्यामुळे किडीच्या विविध अवस्था पक्ष्यांचे नैसर्गिक भक्ष बनतील.

पीक वाढी दरम्यान अळी अवस्था निदर्शनास आल्यास जैविक पध्दती:-

१.बी टी युक्त कीटकनाशकांची 5% wp 400-500gm/एकर

२.शेंगा खाणाऱ्या अळीसाठी NPV हे विषाणू जनीत कीटकनाशक 2%-S 100-200 ml /एकरी

जेव्हा कीड आर्थिक नुकसान पातळीच्या वर जातेय अस जाणवल्यासच

रासायनिक पद्धती:- खालीलपैकी एका कीटकनाशकाचा उपयोग करावा. बेंफ्युराकार्ब ४०% EC1000 ml in 200 l of water/acre क्लोरँट्रानिलीप्रोल १८.५% SC60 ml in 200-300 I of water/acre डायमिथोएट ३०% EC 494.8 ml in 200-400 I of water/acre इमामेक्टीन बेन्झोएट 5% SG 88 g in 200-300 I of water/acre लॅमडा-सायहेलोत्रिन 5% EC 160-200 ml in 160-240 I of water/acre

रासायनिक कीटकनाशके वापरण्याआधी घ्यावयाची काळजी:- रासायनिक फवारणी घेणे खरंच गरजेची असेल तरच फवारणीचा निर्णय घ्यावा. किटकनाशक खरेदी केल्यानंतर लेबल क्लेम नीट वाचावे. अपुऱ्या माहितीनुसार रसायने एकमेकांत मिसळणे टाळावे. दर वेळी एकच कीटकनाशक न फवारता आलटून पालटून फवारणी करावी म्हणजेच किडीमध्ये प्रतिरोधक क्षमता तयार होणार नाही.

फवारणी सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळी करावी.

**संदर्भ:- राष्ट्रीय वनस्पती स्वास्थ प्रबंधन संस्था, राजेंद्रनगर, हैदराबाद**

लातूर
# भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
गुरूवार १४ सप्टेंबर २०२३


## सरकारची मोठी घोषणा, ७५ लाख महिलांना मिळणार मोफत गॅस सिलिंडर

नवी दिल्ली : केंद्रातील मोदी सरकारने देशातील ७५ लाख महिलांसाठी मोठी घोषणा केली आहे. उज्ज्वला योजनेच्या दुसऱ्या टप्प्याला बुधवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या अंतर्गत ७५ लाख नवीन मोफत एलपीजी कनेक्शन वितरित केले जातील. सध्या ९.५९ कोटी महिला उज्ज्वला योजनेचा लाभ घेत आहेत. नवीन मोफत एलपीजी कनेक्शनचे वितरण केल्यानंतर त्यांची संख्या १० कोटींच्या पुढे जाईल. उज्ज्वला योजना ही मोदी सरकारच्या प्रमुख योजनांपैकी एक आहे. देशभरातील मागासलेल्या आणि गरीब घटकातील महिलांना स्वच्छ स्वयंपाकाचे इंधन देण्यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरू केली होती.

## तोंडार जिल्हा परिषद शाळेतील विषबाधा प्रकरणी मुख्याध्यापकाचे निलंबन; चौकशीही होणार

लातूर : उदगीर तालुक्यातील तोंडार येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना खिचडीतून विषबाधा प्रकरणी उदगीर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या शालेय पोषण आहारचे लेखाधिकारी यांनी भेट देवून अहवाल सादर केला आहे. याप्रकरणी या शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक रणजीत भानुदास फड यांना जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांची चौकशी केली जाणार आहे. तसेच खिचडी शिजविणारी स्वयंपाकी यांना जबाबदार धरून त्यांच्यावर पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी यांनी दिली आहे. तोंडार येथील जिल्हा परिषद शाळेत शालेय पोषण आहारातील खिचडी व हरभरा उसळ खाल्ल्यामुळे ८७ पैकी १५ विद्यार्थ्यांना विषबाधेची लक्षणे दिसून आली होती. त्यांना तातडीने उदगीर येथील सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तसेच उर्वरित ७२ विद्यार्थ्यांची तालुका आरोग्य अधिकारी यांनी शाळेत जावून तपासणी करून त्यांच्यावर उपचार केले होते.

## राज्यस्तरीय आयएसपी पी. जी. परिषदेत डॉ. निकिता पालकर यांना व्दितीय तर डॉ. आशुतोष अगरवाल यांना तृतीय पुरस्कार

लातूर : इंडियन सोसायटी ऑफ पेरियोडाँटोलॉजी मुंबई स्टडी ग्रुप च्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'आयएसपी इंटीग्रेट पदव्युत्तर परिषद २०२३' मध्ये लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील दंत परिवेष्ठन शास्त्र विभागातील एम. डी. एस. पदव्युत्तर अभ्यासक्रमाची विद्यार्थीनी डॉ. निकिता विकासराव पालकर व डॉ. आशुतोष राजेश अगरवाल यांनी सादर केलेल्या केस स्टडी सादरीकरणास अनुक्रमे व्दितीय व तृतीय पुरस्कार मिळाला आहे.

मुंबई येथे दि. ८ ते ९ सप्टेंबर या कालावधित संपन्न झालेल्या राज्यस्तरीय आयएसपी इंटीग्रेट पदव्युत्तर परिषदेत दंत परिवेष्ठन शास्त्र विषयातील एम. डी. एस. अभ्यासक्रमाची द्वितीय वर्षातील विद्यार्थीनी डॉ. निकीता पालकर यांनी 'डायरेक्ट सायनस लिफ्ट फॉलोड बाय इनडायरेक्ट सायनस लिफ्ट एड इम्प्लांट प्लेसमेंट इन सिव्हियरली ट्रॉफिक मॅगझीला' या विषयावर सादर केलेल्या केस स्टडी सादरीकरणास व्दितीय पुरस्कार मिळाला तर डॉ. अशुतोष अगरवाल यांनी 'सॉकेट शिल्ड टेक्निक फॉर इम्प्लांट प्लेसमेंट' या विषयावर सादर केलेल्या केस स्टडी सादरीकरणास तृतीय पुरस्कार मिळाला आहे.

त्याचबरोबर या अधिवेशनात एम. डी. एस. अभ्यासक्रमाची द्वितीय वर्षातील विद्यार्थीनी डॉ. सुरभी पाटील यांनीही सहभाग नोंदवून केस स्टडी सादरीकरण केले. तसेच या परिषदेत प्रा. डॉ. ओमकुमार बघेले यांनी गेस्ट स्पीकर म्हणून मार्गदर्शन केले तर प्रा. डॉ. गौरी उगले यांनी या परिषदेत परिक्षक म्हणून काम पाहिले.

या केस स्टडी व शस्त्रक्रियेच्या कार्यासाठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विष्णुदास भंडारी, प्रा. डॉ. ओमकुमार बघेले, प्रा. डॉ. गौरी उगले, सहयोगी प्रा. डॉ. राघवेंद्र मैत्री यांनी मार्गदर्शन केले तर डॉ. प्रिया नागरगोजे, डॉ. तृप्ति गिरी, डॉ. मिथिला काकडे, डॉ. अमृता केंद्रे यांचे सहकार्य लाभले.

या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. विष्णुदास भंडारी यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.

# दिव्यांग बांधवांना योजनांचा लाभ देण्यावर भर

## -जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे



लातूर : दिव्यांगांच्या शासकीय योजनांचा जिल्हाभरात जागर व्हावा. पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ वेळेवर मिळावा, यावर जिल्हा प्रशासनाचा अधिकाधिक भर असल्याची माहिती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिली.

मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय, समाज कल्याण विभागाच्यावतीने दिव्यांगांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, दिव्यांगजन सशक्तीकरण विभागाच्या केंद्रीय सल्लागार मंडळाचे सदस्य सुरेश पाटील, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, निवडणूक उपजिल्हाधिकारी सुचिता शिंदे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, व्ही.के. गाडेकर, सतीश भापकर आदींची कार्यशाळेस उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे म्हणाल्या, शिक्षक प्रत्येकाच्या जीवनाला आकार देतात. परंतु दिव्यांगांना शिक्षित करणारे शिक्षक यांचा मला विशेष अभिमान वाटतो. दिव्यांगांमध्ये असलेली कला, सुप्त गुणांची पारख करून त्यांना घडविण्याचे, त्यांना आर्थिक सक्षम करण्याचे काम या जिल्ह्यातील शिक्षक करत आहेत, याचे खूप समाधान आहे. कार्यशाळेच्या परिसरात दिव्यांगांनी उभारलेले विविध गृहोपयोगी वस्तूंचे स्टॉल्स, रेखाटलेली चित्रे, रांगोळी यातून दिव्यांगांमधील कलेचे, शक्तीचे दर्शन होते, असेही त्या म्हणाल्या. त्याचबरोबर दिव्यांगांची मतदार म्हणूनही देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका आहे. म्हणून पात्र दिव्यांगांनी मतदार यादीत आवर्जून नावाची नोंदणी करावी, असे आवाहन श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले.

कार्यशाळेत पात्र लाभार्थ्यांना आवश्यक साहित्यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तर राष्ट्रीय न्यास अधिनियमांतर्गत विविध योजनांवर श्री. पाटील, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम यावर श्री. भापकर, नेत्र व दंत चिकित्सा मोबाईल व्हॅन व रेटिनोपॅथी यावर डॉ. गौरी कुलकर्णी, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आयटीआय प्रवेशायाबाबत श्री. गाडेकर, राजाभाऊ चौगुले यांनी देखील कार्यशाळेत मार्गदर्शन केले. श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यशाळेला सुरूवात झाली. सूत्रसंचालन सिंधु इंगळे-काटे यांनी केले.

## लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळातील दोन अभियंते एका कर्मचाऱ्याला राज्य शासनाचा पुरस्कार जाहीर



लातूर : भारतरत्न सर विश्र्वेश्र्वरय्या यांचा १५ सप्टेंबर हा जन्मदिवस दरवर्षी 'अभियंता दिन' म्हणून राज्य शासनातर्फे साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने सार्वजनिक बांधकाम विभागात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अभियंता व कर्मचारी यांना राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतो. सन २०२२-२३ मधील उल्लेखनीय कामगिरीबद्दल लातूर सार्वजनिक बांधकाम विभागातील दोन अभियंते आणि एका कर्मचाऱ्याची या पुरस्कारासाठी निवड झाली असून १५ सप्टेंबर २०२३ रोजी मुंबई येथील षण्मुखानंद सभागृहात आयोजित कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण होईल. राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये निलंगा सार्वजनिक बांधकाम विभागातील उपकार्यकारी अभियंता सुनील गोविंदराज बिराजदार आणि लातूर सार्वजनिक बांधकाम विभागातील शाखा अभियंता लोभाजी आयलुजी घटमल यांचा समावेश आहे. तसेच लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळ येथील कनिष्ठ लिपिक गजानन शिवाजीराव चव्हाण यांनाही पुरस्काराने गौरविण्यात अयेणार आहे.

## 'आयुष्मान भवः' मोहिमेत गावे क्षयमुक्त करावीत-अनमोल सागर

लातूर : देशात १३ सप्टेंबर २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत 'आयुष्मान भवः' मोहीम राबविली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत गावे क्षयमुक्त करावीत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी केले. भातांगळी प्राथमिक आरोग्य केंद्रात 'आयुष्मान भवः' मोहिमेच्या जिल्हास्तरीय उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.

आरोग्य विभागाच्या उपसंचालक डॉ. अर्चना भोसले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बेरूरे, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अर्चना पंडगे, जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी डॉ. नितीन बोडके, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. तांबारे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पाठक यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

समाजातील सर्वघटकांनी 'आयुष्मान भवः' मोहिमेत सहभागी होवून आरोग्यदायी जीवनाची सुरुवात करावी. सर्व गावांनी यात सहभागी होवून गावे क्षयरोगसारख्या आजारातून मुक्त करणेचे आवाहन श्री. सागर यांनी केले. अवयवदानाची चळवळ व्यापक करणे आवश्यक असून जास्तीत जास्त ग्रामस्थांनी या मोहिमेत सहभागी व्हावे. तसेच 'आयुष्मान भवः' मोहिमेमुळे आजारांचे लवकर निदान होण्यास मदत होणार असून वेळेत सर्व आजाराचे निदान झाले तर समाज सुदृढ होण्यास मदत होईल, असे मत आरोग्य विभागाच्या उपसंचालक श्रीमती डॉ. भोसले यांनी व्यक्त केले.

### जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा व परिसरातील विशेषतः रेणापूर येथील मौजे इंदरठाणा, ता. रेणापूर, जि. लातूर भागातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार-प्रा. रामदास विनायकराव माने, रा. लातूर, ता. जि. लातूर यांनी मला दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरून तसेच मला वकील म्हणून अधिकृत केलेवरून सर्व जनतेच्या माहितीस्तव खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे. माझे पक्षकार यांनी विद्यमान मालक-जरिनाबी नैमुद्दीन शेख, रा. खोरी गल्ली, लातूर यांच्या मालकी कब्जेवहिवाटीची जमीन मौजे इंदरठाणा, ता. रेणापूर, जि. लातूर येथील जमीन गट नंबर-८ मधील एकूण जमीन क्षेत्र-०१ हे. ७९ आर असून, यापैकी विक्री क्षेत्र ०१ हे. ७७ आर जमीन असून, या विक्री क्षेत्र शेतजमीनीची चर्तू:सिमा पुढीलप्रमाणे- पूर्वेस -रौफ पटेल यांची जमीन, पश्चिमेस- १) परविन इनामदार व २) अशादुल्ला सय्यद यांची शेत जमीन, दक्षिणेस- इंदरठाणा-सांगवी रोड, उत्तरेस- रहीम सय्यद यांची शेत जमीन.

येणे प्रमाणे वरील चतुःसिमेच्या आतील जमीनीचे विद्यमान मालकाकडून तोंडी ठरावपत्र करून घेवून माझे पक्षकारासोबत सदरची जमीन कायमस्वरूपी विक्रीचा तोंडी ठरावपत्र साक्षीदारासमक्ष करून देऊन इसारापोटी कांही रक्कम माझे पक्षकाराकडून स्विकारली आहे व उर्वरीत रक्कम खरेदीखताच्या वेळी देण्याचे ठरले आहे. तसेच सदरची जमीन ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास विद्यमान मालकांनी दिलेली आहे. तरी सदर जमीनबाबत जर कोणाचा उजर, आक्षेप हीतसंबंध, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजाऱ्याचा वाद, शासकीय अथवा निमशासकीय कर्जबोझा, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसाचे आत माझे खालील दिलेल्या कार्यालयीन पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर/ आक्षेप दाखल करावा व त्याची रिसतर पोहच घ्यावी. मुदतीमध्ये जर कोणाचा उजर/ आक्षेप नाही आल्यास सदरची जमीन ही निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहित धरून माझे पक्षकार सदरची जमीन ही नोंदणीकृत खरेदीखत मुळ मालकाकडून आपल्या हक्कात करून घेतील व त्यानंतर येणारे उजर/ आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक : १४/०९/२०२३

तर्फे
**ॲड. एम. व्ही. माडगे**
यशवंतराव कॉम्पलेक्स, गाटा नं. १२,
जिल्हा न्यायालयाच्या शेजारी, लातूर
मो. नं. ९३५९०२१७२१

जाहिर प्रगटन देणार
**प्रा. रामदास विनायकराव माने**
रा. लातूर, ता. जि. लातूर
मो. नं. ८९०६८४३३३३

### CHANGE OF NAME

I have change my name from **SWAMI POURNIMA UMASHANKAR** to **SWAMI POORNIMA UMASHANKAR** hence for this declaration in future I will use this name **SWAMI POORNIMA UMASHANKAR** in future the same name will be used by my children and Husband.

**OLD NAME : SWAMI POURNIMA UMASHANKAR**
**NEW NAME : SWAMI POORNIMA UMASHANKAR**
**ADDRESS :** 'Shriphal' Manthale Nagar, Near Gore Hospital, Latur - 413512

### CHANGE OF NAME

I have change my name from **SWAMI POURNIMA** to **SWAMI POORNIMA UMASHANKAR** hence for this declaration in future I will use this name **SWAMI POORNIMA UMASHANKAR** in future the same name will be used by my children and Husband.

**OLD NAME : SWAMI POURNIMA**
**NEW NAME : SWAMI POORNIMA UMASHANKAR**
**ADDRESS :** 'Shriphal' Manthale Nagar, Near Gore Hospital, Latur - 413512

### CHANGE OF NAME DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **SHAIKH HANEEF SHAIKH MD ASGHAR TO : SHAIKH HANEEF ASGHAR** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE SHAIKH HANEEF ASGHAR IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY WIFE/ CHILDREN AND RELATIVE.

**OLD NAME :- SHAIKH HANEEF SHAIKH MD ASGHAR**
**NEW NAME :- SHAIKH HANEEF ASGHAR**
**ADDRESS :-** PAIGAMBAR PURA UDGIR DIST.LATUR MS

### टी. सी. हरवली आहे

अनिल भगवान बोंबलगे या नावाची जि. प. प्रशाला, आखरवाई, ता. जि. लातूर येथून ७ वी पास झाल्याची टी. सी. आखरवाई ते लातूर दरम्यान प्रवास करताना हरवली आहे. तरी कोणास मिळून आल्यास त्यांनी खालील मोबाईल क्रमांकावरती संपर्क साधावा.

संपर्क : मो. क्र. ९७६६६०६७८४

### लक्ष्मी बहुउद्देशिय सहकारी नागरी पतपुरवठा संस्था म., लातूर

#### अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

दिनांक : १४/०९/२०२३

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या अधिमंडळाची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन मा. श्री. प्रल्हाद रामचंद्र दुडिले यांचे अध्यक्षतेखाली शुक्रवार दि. २९-०९-२०२३ रोजी सायंकाळी ठिक ०५.०० वाजता भालचंद्र ब्लड बँक, गांधी मार्केट, लातूर येथील सभागृहात खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेण्यासाठी आयोजीत करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

-: सभेपुढील विषय :-

१. मागील वार्षीक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दिनांक ३१/०३/२०२३ अखेर संपलेल्या आर्थीक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संमत करणे व नफा विभागणीस मान्यता देणे.
३. सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रकास मान्यता देणे. तसेच, सन २०२२-२०२३ वर्षातील अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
४. बाहेरील कर्जाची मर्यादा ठरवणे.
५. अंकेक्षण अहवाल वाचन व मान्यता.
६. सन २०२३-२०२४ सालच्या वैधानीक लेखा परिक्षकांची व आयकर लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे बाबत.
७. संस्थेच्या पोटनियम दुरूस्तीस मान्यता देणे.
८. थकबाकीदार सभासदांकडील एकरक्कमी परतफेड योजने अंतर्गत व्याज सवलत दिलेल्या रक्कमेस मान्यता देणे बाबत.
९. मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनीमय करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
**भरत सुर्यवंशी**
(प्र. व्यवस्थापक)

नोटः-
१. गणसंख्येअभावी सभा स्थगित झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी एका तासानंतर सभा घेण्यात येईल व त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
२. अहवाल सालातील पतसंस्थेच्या आर्थिक स्थितीबाबतची पत्रके (ताळेबंद, नफा-तोटा पत्रक) पतसंस्थेच्या सुचना फलकावर डकविण्यात आलेली आहेत.
३. संस्थेच्या कामकाजाबाबत सभासदांस काही प्रश्न विचारावयाचे असल्यास सभेच्या दिनांकापुर्वी सात दिवस अगोदर कार्यालयीन वेळेत संस्थेच्या कार्यालयात लेखी सादर करावेत. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

### लातूर जिल्हा द्राक्ष उत्पादक शेतकरी सहकारी संघ म. लातूर

#### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरीता)

संघाच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा वार शुक्रवार दि. ३०.०९.२०२३ रोजी सकाळी १०.३० वा. संघाच्या एम.आय.डी.सी. प्लॉट नं. अे ७१/२ येथील कोल्ड स्टोरेजवर चेअरमन मा. श्री. सोनवणे शिवाजी माणिकराव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येत आहे.

तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

: सभेपुढील विषय :

१. मागील सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२. दि. ३१.०३.२०२३ रोजी संपलेल्या वर्षाचे व्यापारी पत्रक, नफा तोटा पत्रक व ताळेबंदचे वाचन व वर्षाचा अहवाल स्विकारणे.
३. सन २०२२-२०२३ अंदाजपत्रकापेक्षा कमी-जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
४. सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
५. दि.१.०४.२०२२ ते दि. ३१.०३.२०२३ अखेर झालेल्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेऊन अहवालातील अभिप्राय वाचून त्यास मान्यता देणे.
६. सन २०२३-२०२४ या कालावधीचे लेखापरिक्षण करण्यासाठी शासन मान्य लेखा परिक्षकाची नेमणूक करणे व त्याचे मानधन ठरवणेबाबत.
७. प्रत्यक्षात येणे देणे नसलेल्या खात्याचा जमा खर्च (राईट ऑफ) करणेबाबत.
८. मुदतबाह्य झालेला माल राईट ऑफ करणेबाबत.
९. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयावर विचार करणे.

**स्थळ : लातूर**
**दिनांक : १४.०९.२०२३**

आपला विश्वासू
**शिंदे यु. बी.**
प्रभारी व्यवस्थापक
संचालक मंडळाच्या आदेशावरून

: टीप :
१. गणंसख्या पुर्तीचे अभावी सभा स्थगित झाल्यास तीच सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२. संघाच्या कामकाजाबद्दल सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास ते लेखी व वार्षिक सभेच्या आठ दिवसापुर्वी संघास मिळावयास पाहिजेत. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती
ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते